# जिल्हा परिषद अमरावती

अत्यंत महत्वाचे /ईमेलव्दारे

क्रमांक - जिप/मुकाअ/स्विस/ ११५ /१६

मुख्य कार्यकारी अधिकारी यांचे कार्यालय,

दिनांक - ७ सप्टेबर, २०१६ १४

प्रति,

गट विकास अधिकारी,

पंचायत समिती सर्व,

---

विषय - पंचायत समिती स्तरावर करावयाच्या कार्यवाहीबाबत..

मा. विभागीय आयुक्त, अमरावती यांनी दिनांक ७ सप्टेबर २०१६रोजी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेसोबत झालेल्या बैठकीचे अनुषंगाने दिलेल्या सूचना व त्यानुसार गट विकास अधिकारी यांनी खालील प्रमाणे मुद्दे निहाय करावयाची कार्यवाही -

१. ग्रामपंचायत स्तरावर शासकीय जमिनीवरील अतिक्रमण काढताना सर्वप्रथम मा. जिल्हाधिकारी यांची परवानगी घेणे आवश्यक आहे. अशी कार्यवाही करताना पंचायत समितीस्तरावर कार्यवाही होत नसल्याची बाब निदर्शनास येत आहे. आणखी असेही निदर्शनास येत आहे की, अतिक्रमण काढण्याची नोटीस देताना फक्त निवडक अतिक्रमणधारकांनाच नोटीस दिल्या जातात याव्दारे आपणास स्पष्ट सूचित करण्यात येते की, अतिक्रमण काढण्याची कार्यवाही करताना सर्व अतिक्रमणधारकांना नोटीस देण्यात याव्यात.

२. गाव निहाय/ग्रामपंचायत निहाय घरकर वसूली स्थिती असमाधानकारक आहे. फेर कर आकारणी संदर्भात मार्गदर्शन करण्यात आलेले आहे. त्यानुसार अद्यापपर्यत आकारणी झाली नसल्याचे निदर्शनास आलेले आहे. मुल्यांकनानुसार किती ग्रामपंचायती आकारणी केली व त्याप्रमाणे किती ग्रामपंचायतीनी वसूलीस सुरुवात केली. याबाबतची ग्रामपंचायत निहाय माहिती ३० सप्टेबर २०१६ पर्यत पंचायत विभागास सादर करावी. सदरची कार्यवाही ३० सप्टेबर पर्यत झालेली नसेलतर याबाबत वैयक्तिक गट विकास अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

३. पंचायत समिती कार्यक्षेत्रातील प्राथमिक आरोग्य केंद्रांना आठवडी भेटीचे नियोजन आपले स्तरावर करावे. प्रत्येक आठवडयाला आपल्या कार्यक्षेत्रातील किमान एका प्राथमिक आरोग्य केंद्रास गट विकास अधिकारी यांनी भेट देवून प्राथमिक आरोग्य केंद्राच्या वैद्यकीय सेवा सुविधांबद्ल तक्रारी येणार नाहीत यासाठी प्रतिबंधात्मक उपाययोजना करण्याची जबाबदारी गट विकास अधिकारी यांचेवर सोपविण्यात येत आहे. ग.वि.अ. यांनी आपल्या भेटीत विहीत नमुन्यात तपासणीफॉर्म भरुन त्याची एक प्रत माइया स्वीय सहायकांकडे पाठवावी. याबाबत काही अडचणी किंवा सभांव्य उपाययोजना करावयाचे झाल्यास जिल्हा आरोग्य अधिकारी यांचेशी थेट संपर्क साधून तसे अवगत करावे. यानंतर प्राथमिक आरोग्य केंद्राच्या सेवा सुविधांबाबत तक्रारी प्राप्त गट विकास अधिकारी यांना जबाबदार धरण्यात येईल.

४. गट विकास अधिकारी यांनी आपल्या तालुक्यातील शेतकरी आत्महत्याग्रस्त कुटूंबाना भेट द्यावी. शासनाच्या विविध योजनांचा लाभ पात्र शेतकरी आहत्महत्याग्रस्त कुटूंबाला मिळाला पाहीजे याबाबत संबंधित यंत्रणेकडे पाठपुरावा करावा.

५. ग्रामसेवक मुख्यालयी राहणे बंधनकारक आहे. ग्रामसेवक त्याच्या साझामध्ये हजर राहतो किंवा नाही याची खात्री आपले माध्यमातून करावी. ग्रामभेटीचे दिवस ग्रामसेवकांना घोषित करुन द्यावेत. घोषित दिवसांवर ग्रामसेवक संबंधित गावास हजर राहत नसल्यास याबाबतची गंभीर दखल यास्तरावर घेण्यात येईल याची जाणीव सर्व ग्रामसेवक/ग्रामविकास अधिका-यांना करुन द्यावी. तसेच आपले आकस्मिक भेटीच्या दरम्यान गैरहजर आढळलेल्या ग्रामसेवकांविरुध्द गंभीर शास्तीचा प्रस्ताव तयार करुन पंचायत विभागाकडे सादर करावा व तसे मला अवगत करावे.

६. महात्मा गांधी नरेगा योजनेतंर्गत कामांसाठी मजुरांना वेळेत मजुरी देणे कायद्यानुसार बंधनकारक आहे. परंतु असे निदर्शनास येत आहे की, एक महिन्यांपेक्षा जास्त कालावधीचे मस्टर पेंडींग राहत आहेत. याबाबतच्या सविस्तर सूचना माझे दिनांक ८ सप्टेबर २०१६ रोजीच्या अर्ध शासकीय पत्राव्दारे आपणास देण्यात आलेल्या आहेत. त्यानुसार कार्यवाही करावी व तसा दर आठवडी अहवाल नरेगा कक्षाकडे सादर करावा.

७. सेवा हमी कायदा हा शासनाच्या महत्वाकांक्षी कार्यक्रम आहे. सदर कायदयाची अंमलबजावणी व्यवस्थित होते किंवा नाही हे पाहणे आवश्यक आहे. यामध्यामातून सर्व ग्रामपंचायत स्तरावर नागरीकांना अधिकाधिक सेवा उपलब्ध करुन द्याव्यात व आवश्यकतेनुसार मार्गदर्शन करावे.

८. आणखी असेही की, पंचायत समितीस्तरावर शासनाच्या / जिल्हा परिषदेच्या विविध योजना- कार्यक्रम, उपक्रम राबविले जात आहेत, त्याबाबतची प्रगतीपथावरील माहिती तसेच काही यशोगाथा असतील तर अश्या माहितीची एक प्रेसनोट तयार करुन जि.प. मुख्यालयाच्या माहिती व तंत्रज्ञान कक्षास (I.T. Cell) दरमहा न चुकता पाठवावयाची आहे. सदरची माहिती कोणत्या तारखेस पाठवावी लागेल याबाबतची तारीख आणि वेळापत्रक I.T. Cell कडून आपणास दूरध्वनीव्दारे किंवा ई-मेलव्दारे कळविण्यात येईल.

वरील मुद्यांची गांभीयाने दखल घेऊन आपण कार्यवाही कराल व संघभावनेने काम करुन अमरावती जिल्हा परिषदेचे कामकाज उत्कृष्ट पध्दतीने चालू ठेवाल, अशी माझी अपेक्षा आहे. कामकाजाबाबत आपल्या अडीअडचणी, शंका इ. बाबत माझ्याशी अथवा संबंधित खातेप्रमुखाशी भ्रमणध्वनीवर संपर्क साधून शंकानिरसन करुन घ्यावे.

शुभेच्छासह.

(डॉ. किरण कुलकर्णी, भाप्रसे)
मुख्य कार्यकारी अधिकारी
जिल्हा परिषद अमरावती

प्रतिलिपी -

१. अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी जि.प. अमरावती.
२. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, ग्रामपंचायत, जि.प. अमरावती यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव अग्रेषित.
३. उप मुख्य कार्यकारी अधिकारी, नरेगा, जि.प. अमरावती यांना माहिती तथा कार्यवाहीस्तव अग्रेषित.
४. जिल्हा आरोग्य अधिकारी, जि.प. अमरावती यांना माहिती तथा पुढील कार्यवाहीस्तव अग्रेषित.
५. कृषि विकास अधिकारी, जिल्हा परिषद अमरावती.
६. माहिती व तंत्रज्ञान कक्ष, (I.T. Cell) जि.प. अमरावती.